महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २७४ वा | दिनांक : २९/०८/२०२५ | वार : शुक्रवार

## फडणवीसांनी जातीजातीचे तुकडे पाडले -संजय राऊत



**मुंबई :** कबुतरांसाठी आंदोलन करणाऱ्यांना सरकार परवानगी देते.तर मराठी माणसांना त्यांच्या मागण्यासाठी आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मग ते कुणीही असो. मुंबईमध्ये जर कबुतरांसाठी आंदोलन होऊ शकते तर मराठी माणूस जर त्यांच्या मागण्यासाठी राज्याच्या राजधानी मुंबईची निवड केली असेल तर मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याशी चर्चा केली पाहिजे, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे. तर गणेशोत्सवाच्या काळात मुंबईच्या कायदा-सुव्यवस्थेची काळजी घेणं गरजेचे आहे.

संजय राऊत म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या मुद्यावर शरद पवार, उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. केंद्रामध्ये गेली 10 वर्षे मोदी सत्तेत बसले आहेत. आरक्षणाचा विषय त्यांच्याकडूनच सोडवला जाऊ शकतो. ते केवळ आश्वासन देत फिरत आहे. देवेंद्र फडणवीस 5 वर्षांहून अधिक मुख्यमंत्री आहेत ना हे खापर तुम्ही दुसऱ्यावर फोडू शकत नाही. राधाकृष्ण विखे पाटलांना प्रशासनाचा अनुभव आहे. तुम्ही शरद पवार आणि उद्धव ठाकरेंकडे बोट दाखवत बसू नका.

संजय राऊत म्हणाले की, मनोज जरांगे पाटील हे मुंबईत आंदोलन करण्यासाठी येत आहेत. त्यांच्या मागण्यांविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सरकारला नव्याने माहिती देणं गरजेचे नाही. विधानसभा निवडणुकीच्या आधी सरकारने जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली. पुन्हा सरकार आलेले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी शब्दाला जागून त्यांनी हे पूर्ण करावे. मुंबई ही मराठी माणसाची आहे, त्यांना मुंबईमध्ये येण्यापासून कुणीही रोखू शकत नाही. मुंबईमध्ये येण्यापासून त्यांना रोखू नये, ही आमची भूमिका आहे,

संजय राऊत म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्यापेक्षा जास्त त्यावर राजकारण सुरू आहे. जाती-जातींमध्ये भेदाभेद करण्याचे काम गेल्या 10 वर्षांमध्ये जास्त झाले आहे. केंद्रात नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांनी जातीजातींचे तुकडे पाडण्याचे काम केले. बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसांची भक्कम एकजूट निर्माण केली होती. त्यात प्रत्येक जातीचा माणूस दिसून येत होता. पण एकजूट राहू नये यासाठी या लोकांकडून प्रयत्न सुरू आहेत. हे सर्व सत्ता मिळवण्यासाठी फडणवीसांनी सुरू केले आहे. हे दुर्दैवी आहे. हे मराठी माणसांसाठी वेदनादायक आहे.

संजय राऊत म्हणाले की, मनोज जरांगे पाटील हे मोठे नेते असून त्यांच्या पाठीमागे त्यांचा समाज मोठ्या प्रमाणात उभा आहे. ते त्यांच्या समाजाच्या काही मागण्या घेऊन सरकारकडे येत आहेत. ते काही इतर देशाच्या नेतृत्वाकडेच ही मागणी करु शकत नाही. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आहेत म्हणून ते त्यांच्याकडे आले आहेत. नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस हे पदावर नसतील तर ते दुसऱ्या व्यक्तीकडे आपल्या मागण्या घेऊन जातील असेही राऊतांनी म्हटले आहे. तुमच्याकडे व्यक्ती म्हणून नव्हे तर पालक म्हणून आम्ही मागणी केली आहे.

आमच्या मराठा बांधवांना आरक्षण देण्याचे काम देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते आरक्षण घालवण्याचे काम उद्धव ठाकरे यांनी केले. ते आज मराठा समाजाबद्दल बोलत आहेत. संजय राऊत यांना मराठा आंदोलन किंवा मराठा आरक्षणाबद्दल बोलण्याचा अधिकार नाही, असे म्हणत भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी संजय राऊतांसह उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला आहे. तर मराठा बांधवांचा सातत्याने अपमान करण्याचे काम संजय राऊत यांनी केली होते.

## मनोज जरांगे यांच्या मागण्या रास्तच : पण त्यांनी आंदोलनापेक्षा चर्चेसाठी पुढे यावे - दादा भुसे



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्याच्या राजधानीकडे निघालेल्या मनोज जरांगे यांच्या मागण्या रास्तच असल्याचे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते तथा राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी गुरूवारी व्यक्त केले. त्यांच्या या भूमिकेमुळे मराठा आरक्षणाच्या मुद्यावर तूर्त कानाडोळा करणाऱ्या महायुती सरकारची अडचण वाढण्याची शक्यता आहे.

मनोज जरांगे पाटील आपल्या लाखो समर्थकांसह मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईच्या दिशेने निघालेत. ते आज सायंकाळी किंवा रात्री उशिरा मुंबईत पोहोचतील. त्यानंतर उद्यापासून ते आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाला बसतील. त्यांच्या आंदोलनामुळे मुंबईत रहदारीचा प्रश्न उद्धवण्याची भीती असल्यामुळे सरकारची गोची झाली आहे. पण त्यानंतरही तूर्त तरी सरकारने या आंदोलनाकडे कानाडोळा केल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मनोज जरांगे यांच्या मागण्या रास्तच असल्याची भावना व्यक्त केली आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या रास्तच आहेत. याविषयी कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. पण मुंबई, कोकण, आपला देश आणि जगाच्या पाठीवर गणपती बाप्पांचा उत्सव साजरा केला जात आहे. त्यामुळे जरांगेंनी या कालावधीत आंदोलन करण्यापेक्षा चर्चा करण्यासाठी पुढे यावे. असे झाले तर चर्चेतून निश्चितच एखादा चांगला समाधानकारक तोडगा निघू शकतो, असे दादा भुसे गुरूवारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले.

सत्ताधारी भाजपकडून मनोज जरांगेंवर आक्रमक पद्धतीने टीका केली जात आहे. त्यातच दादा भुसे यांनी या प्रकरणी काहीशी सौम्य भूमिका घेतल्यामुळे त्यांची भूमिका राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनली आहे.

तत्पूर्वी, एकनाथ शिंदे यांनीही मनोज जरांगे यांना चर्चेचे आवाहन केले होते. गणपती उत्सवानिमित्त देशविदेशातून लाखो गणेशभक्त महाराष्ट्रात विशेषतः मुंबईत येत असतात. त्यांची कुठेही गैरसोय होऊ नये ही माझी भावना आहे. याचे भान व काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे. त्यामुळे मनोज जरांगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या आंदोलनामुळे कोणत्याही गणेशभक्तांची कोणतीही गैरसोय होता कामा नये याची काळजी घेतली पाहिजे. या महाराष्ट्रात अनेक मोठी आंदोलने झाली. परंतु आपल्या आंदोलनाचा इतर लोकांना त्रास होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घेतली आहे, असे ते म्हणाले होते.

## बुलढाणा विधानसभा निकालावर प्रश्नचिन्ह : ठाकरे गटाच्या जयश्री शेळकेंची हायकोर्टात धाव

**नागपूर :** शिवसेना ठाकरे गटाच्या पराभूत उमेदवार जयश्री शेळके यांनी बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निकालाबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली आहे. जयश्री शेळके यांनी आपल्या अर्जात या मतदारसंघातील मतमोजणीवर आक्षेप घेत निवडणूक याचिका दाखल केली असून, फेरमोजणीची मागणी केली आहे. शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी ही याचिका फेटाळण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मात्र, शेळके यांनी गायकवाड यांचा अर्ज निराधार असल्याचे सांगत आपल्या याचिकेवर गुणवत्तेच्या आधारावर निर्णय घेण्याची विनंती केली आहे.

गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत बुलढाणा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार संजय गायकवाड हे अवघ्या 841 मतांनी निवडून आले आहेत. केवळ 800 मतांच्या फरकामुळे ठाकरे गटाच्या पराभूत उमेदवार जयश्री शेळके यांनी मतमोजणीवर आक्षेप घेत, मतमोजणी प्रक्रियेत अनेक अनियमितता झाल्याचा दावा केला आहे.

जयश्री शेळके यांच्या मते, मतदार यादीमध्ये 3 हजार 561 बोगस नावे होती. अनेक मतदारांची नावे दोन किंवा अधिक ठिकाणी होती आणि काही ठिकाणी मृत व्यक्तींच्या नावावरही मतदान झाले. त्यामुळे, सर्व ईव्हीएम न्यायालयात आणून न्यायालयासमक्ष पुन्हा मोजणी केली जावी, अशी त्यांची मागणी आहे.

याशिवाय शेळके यांनी मतदारसंघाची संपूर्ण मतदारयादी, मतदान केंद्रांवरील सीसीटीव्ही फुटेज, गायकवाड यांचे विजयाचे प्रमाणपत्र तसेच इतर संबंधित कागदपत्र न्यायालयात सादर करण्याचे आदेश द्यावेत, अशी स्वतंत्र मागणीही केली आहे. या प्रकरणात त्यांच्यावतीने अॅड. आकाश मून यांनी युक्तिवाद केला.

जयश्री शेळके यांनी संजय गायकवाड यांच्या विजयाला आव्हान देत निवडणूक याचिका दाखल केल्यानंतर, संजय गायकवाड यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेतील ऑर्डर 7, नियम 11 अंतर्गत अर्ज दाखल करून ही याचिका फेटाळण्याची विनंती न्यायालयाला केली आहे. मात्र, शेळके यांनी त्याला उत्तर देताना, संजय गायकवाड यांचा अर्ज गुणवत्ताहीन व निराधार आहे. त्यामुळे निवडणूक याचिकेवर गुणवत्तेच्या आधारावर निर्णय देण्यात यावा, अशी विनंती न्यायालयाला केली आहे.

बुलढाणा विधानसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार संजय गायकवाड यांना 91 हजार 660 मते मिळाली. तर ठाकरे गटाच्या जयश्री शेळके यांना 90 हजार 819 मते मिळाली. संजय गायकवाड हे अवघ्या 841 मतांनी विजयी झाले होते. दरम्यान, काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देखील काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतचोरी झाल्याचा आरोप केला आहे. त्यानंतर जयश्री शेळके यांनी न्यायालयात याचिका दाखल केली असून, न्यायालय काय निर्णय देते हे पहाणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २९ ऑगस्ट २०२५


## जूनियर राज्यस्तरीय सेपक टकरो स्पर्धेसाठी जिल्हा संघात निवड





**जळगाव :** २६ वी ज्युनियर व २५ वी सब ज्युनियर महाराष्ट्र राज्य सेपक टकरॉ स्पर्धा (मुले व मुली) नांदेड़ येथे 28 ते 31 अगस्त 2025 च्या दरम्यान आयोजित करण्यात आलेली आहे.सदर स्पर्धेत जळगाव जिल्हयाचे मुले व मुली दोन्ही संघ सहभाग होणार आहे.जिल्हा संघ निवड चाचणी दि.२१-०८-२०२५ गुरुवार रोजी संध्याकाळी 4:00 वाजता अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, प्रताप नगर,जळगाव च्या क्रीडांगणावर ठेवण्यात आलेली होती. या चाचणीत सफवान बागबान व शहजाद खान अंडर 14 यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून आपले नाव भूषविले व क्रीडा विभागाणे विद्यार्थ्यांचे नाव जिल्हा संघात समाविष्ट केले व पुढील चाचणी साठी विद्यार्थ्यांना नांदेड येथे पाठीवण्यात येणार आहे. खेळाडूंचे गुणगौरव संस्थेचे अध्यक्ष डॉ. करीम सालार यांच्या हस्ते करण्यात आला.सर्व स्तरांतील मान्यवरांकडून सफवान व शहजाद खान यांना पुढील वाटचाली साठी अनेक शुभेच्छा देण्यात आल्या. संस्थेचे सचिव एजाज़ मलिक, उपाध्यक्ष डॉ. इक़बाल शाह, मुख्याध्यापक शेख शकील, क्रीडा शिक्षक आमिर खान यांनी दोघांचे कौतुक केले

## स्मृतीशेष प्राजक्ता आठवले यांच्या जन्म दिनानिमित्त विहारास उपयुक्त वस्तू धम्मदान



**बुलढाणा :** जळगांव जामोद, कुरणगाड येथील आनंद बुद्ध विहार व नवयुवक मंडळास स्मृतीशेष प्राजक्ता आठवले यांच्या 32 व्या जन्मदिनानिमित्त स्वयंपाकाची मोठी शेगडी व मोठा तवा यांसह उपयुक्त साहित्य नवयुवक मंडळ व आनंद बुद्ध विहार समिती यांना धम्म दान व खीरदान करण्यात,याप्रसंगी बुद्ध विहार समिती व नवयुवक मंडळाचे पदाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले, उल्लेखनीय उपक्रम राबविल्याने गांवकारी व उपस्थितांनी आनंद व्यक्त केला. याप्रसंगी शहादेव आठवले, गौकर्णा आठवले, अश्विन हेलोडे व अण्णा वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती, यावेळी भन्ते संघपाल यांनी मार्गदर्शन व प्रवचन करताना म्हटले की, डॉ. मिलिंद आठवले यांनी त्यांच्या प्रिय पत्नी प्राजक्ता आठवले यांच्या आठवणी व स्मृती जोपसण्याच्या अनुषंगाने धम्मदान करण्याचा मौलिक असा उपक्रम राबवून महत्वाचे धम्मकार्य केले,प्राजक्ता आठवले यांचे निर्वाण होऊन अवघे 13 दिवस झालेत, आठवले परिवारवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे, त्यामधून सावरण्याची शक्ती त्यांना मिळो,भन्ते संघपाल यांनी यावेळी परित्राण पाठ घेऊन वर्षावास व बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथावर चर्चा घडवून आणली, डॉ. मिलिंद आठवले यांनी प्रास्ताविक करताना म्हटले की, एक पत्नी म्हणून प्राजक्ता हिने संपूर्ण आयुष्य कुटुंब, परिवार व मुलांवर चांगले संस्कार करण्यात घालविले, प्राजक्ता आठवले यांनी कायम कुटुंब व परिवारात प्रेम, ममता, जिव्हाळा, योगदान व शांतता टिकवून ठेवली, प्राजक्ता आठवले हे निर्भीड, लोभ नसलेल, व्यक्तिमत्व आज आपल्यात नाही मात्र, प्राजक्ता आठवले यांचं जीवनकार्य व विचार पुढील पिढीला दिशादर्शक असणार आहेत, प्राजक्ता आठवले यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिलेले धम्मदान हे संपूर्ण गावाच्या सामाजिक व धार्मिक कार्याकरिता उपयोगी असणार असल्याचे डॉ. मिलिंद आठवले यांनी सांगितले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. युवराज आठवले यांनी केले तर आभार विवेक वानखडे यांनी मानले, यावेळी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किशोर भारसाकळे,रमेश आठवले, भीमाभाऊ आठवले,निलेश आठवले, भीमा आठवले, साहिल आठवले, प्रमित आठवले, शौर्य आठवले, अरुण दाभाडे व सुमेध आठवले यांनी प्रयत्न केले.






## आजार माणसांचे

आजार माणसांचे सारे,रानास फार झाले
पावसात या पिकांना, रडविले कविळाने

सरला जरी श्रावण, लपला सूर्य अजुनी
भाद्रपदात गाई नभ,रोज आषाढ गाणे

आभाळ नेसता वस्त्र, सप्तरंगी इंद्रधनुचे
निसर्गराजा खुलून गेला, सोनेरी किरणाने

अजून हरलो नाही, रोज संकटे अस्मानी
लिहिले भाळावरती, जिंकण्यासाठी लढणे

**कवी ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
**मो. नं.** 94033 84889


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २९ ऑगस्ट २०२५

# के. बी. ॲबॅकसने रचला इतिहास - प्राचार्य डॉ. हसन इनामदार



**छत्रपती संभाजीनगर :** सारनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचालित के. बी. ॲबॅकसने महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे १७ ऑगस्ट २०२५ रोजी सिडको एन ८ येथील राणाजी मंगल कार्यालयात भारतातील सर्वात मोठ्या खुल्या ॲबॅकस आणि वैदिक गणित स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये देशभरातील शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार समारंभाचे मुख्य अतिथी मा. ॲड. विशाल कदम (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, संचालक, छ.संभाजी नगर), मा. शिवराज भूमरे (युवा सरपंच, पाचोड), मा. नितीन चव्हाण (उद्योजक, नांदेड), मा. करडे साहेब, मा. डॉ. अभिजीत कंजे (तिरुमला हॉस्पिटल, नांदेड), तसेच मा. सुभाष कोसरे (उद्योजक, छ. संभाजीनगर) उपस्थित होते. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक मा. ॲड. राहुल नावंदर (UPSC स्पर्धा मार्गदर्शक), मा. डॉ. हसन इनामदार (प्राचार्य, मातोश्री कांचन शांतिलाल देसारडा महाविद्यालय,छ. सम्भाजी नगर), सौ. शोभा पवार (प्राचार्या, बी.जी पी.एस.महिला महाविद्यालय,छ. संभाजी नगर) यांनी मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सारनाथ सौंदडकर (संचालक, के. बी. ॲबॅकस, नांदेड) होते . सहभागी स्पर्धकांना १६० प्रश्नांसाठी १० मिनिटांचा वेळ देण्यात आला होता. यामध्ये चॅम्पियन ऑफ चॅम्पियन बड लेवल मध्ये राघव नालकर, न्यू कमर लेवल मध्ये स्वरांश साखरे, प्रथम लेवल अपेक्षा रंधे, दुसरी लेवल साक्षी कावळे, तिसरी लेवल हर्ष भालेराव, चौथी लेवल संस्कार शिंदे, पाचवी लेवल शनया तालन, सहावी लेवल राजयोगिनी चव्हाण, सातवी लेवल रिद्धीश गोवंदे, आठवी लेवल सृष्टी करडे हे विद्यार्थी ठरले. असून; चैंपियन * बड लेवल पूर्वजा कुलकर्णी, न्यू कमर लेवल मन्मथ डोरले, पहली लेवल मायरा खान, दूसरी लेवल वेदांश जाधव तीसरी लेवल, संदेश सौंगडे, चौथी लेवल आरोही इंदुरकर, पाचवी लेवल , श्रेयश तोषटवाड , सहावी लेवल अर्ष बंग * सातवी लेवल , आठवी लेवल शैलेश गायकवाड़ हे विद्यार्थी ठरले। टॉपर्स, विनर्स तथा प्रथम उपविजेता च्या ट्रॉफी चे विजेतपद इतर सहभागी विद्यार्थ्यांना देण्यात आले.* या स्पर्धेला संबोधित करतांना प्रा.डॉ.हसन इनामदार म्हणाले की के. बी.ॲबॅकसच्या विद्यार्थ्यांनी देशाचे नाव उंचावत एक समर्पक इतिहास रचला।स्पर्धेचे अध्यक्ष डॉ सारनाथ सौंदड़कर यांनी विद्यार्थ्यांना आपल्या भाषणांत प्रोत्साहन दिले।कार्यक्रमाचे सूत्र संचलन सुप्रिया कुलधर ,प्रास्ताविक इंजि.सुमित सौंदडकर यांनी केले, तर आभार प्रा,महेश भालेराव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा.शीला सौंदडकर ,प्रा. सुजाता पवार, प्रा. प्रसन्न बनकर प्रा. जया वाघमारे यांनी प्रयत्न केले.

# प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय च्या प्राचार्यपदी श्री उल्हास घुरघुरे यांची निवड



**(मुरुम प्रतिनिधी) :** उमरगा तालुक्यातील मुरूम येथील नगर शिक्षण विकास मंडळाचे संस्थापक /मार्गदर्शक/ आधारस्तंभ माजी राज्यमंत्री आमदार मा.श्री. बस्वराज माधवराव पाटीलसाहेब, संस्थेचे अध्यक्ष बापूरावजी माधवराव पाटील साहेब, उमरगा जनता बँकेचे चेअरमन तथा संचालक शरण बसवराज पाटील साहेब, संस्थेचे सचिव व्यंकट जाधव गुरुजी व सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली मुरूम येथील प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्यपदी माननीय श्री उल्हास घुरघुरे यांची निवड झाल्याबद्दल माध्यमिक व उच्च माध्यमिक सर्व स्टाफ च्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी प्रा. शोभा पटवारी मॅडम,प्रा.राजीव शाळू, प्रा. उमाकांत महामुनी, श्री.प्रा. नाकाडे सुधीर शेषराव, श्री. प्रा.कांबळे आण्णाराव बाबुराव, श्री. प्रा सोलंकर नारायण त्र्यंबक, श्री. ,प्रा रामपूरे सतिश नामदेव,श्री.,प्रा सुर्यवंशी अजित सुर्यकांत, श्री. प्रा बंडगर बिभीषण दत्तात्रय, श्री. प्रा अंबर विश्वजीत चंद्रकात, श्री. प्रा राठोड दयानंद लक्ष्मण,श्री. प्रा. धर्माधिकारी राघवेंद्र शामाचार्य, श्री. प्रा. गायकवाड अमोल मनोहर,श्री. प्रा. वाकडे रत्नदीप राजेंद्र, श्री. प्रा. जमादार सलीम गणी, श्री. प्रा. राठोड अजित मोतीराम, कु. प्रा. उण्णद रेखा रमेश, श्री. प्रा. सांगळे दीपक उद्धव, प्रा. सरस्वती तपसाळे प्रा. माधुरी नरगिडे आदीसह सर्व शिक्षण शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# मंत्री रामदास आठवलेंचे मनोज जरांगेंच्या आंदोलनाला समर्थन



**मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईच्या आझाद मैदानात 29 ऑगस्टपासून आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. या आंदोलनाला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) ने आपला पाठिंबा जाहीर केला आहे. महाबळेश्वर येथे झालेल्या राज्यस्तरीय विचारमंथन शिबिरात मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत एकमताने हा पाठिंब्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

आपल्या आंदोलनाची तयारी करून मनोज जरांगे मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत आणि त्यांनी पुणे जिल्ह्यातील शिवनेरी गडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतले. मनोज जरांगे यांच्या या भूमिकेमुळे ओबीसी समाज आक्रमक झाला असतानाच, आता रामदास आठवले यांच्या पाठिंब्यामुळे या आंदोलनाला वेगळी दिशा मिळण्याची शक्यता आहे.

आठवले गटाच्या सक्षमीकरणासाठी महाबळेश्वर येथे राज्यस्तरीय विचार मंथन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला केंद्रीय मंत्री रामदास आठवले देखील उपस्थित होते. ते म्हणाले, या शिबिरात मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला आपला पाठिंबा असल्याची भूमिका आधीपासून असल्याचे आठवले यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे यांची मागणी आहे की सर्व मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्या. सर्व मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देणे शक्य नाही. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी समाजावर अन्याय नको, अशी आमची भूमिका आहे. तसेच मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत एखादी बैठक घ्यावी आणि फडणवीस यांच्यावरील टीका टाळावी, असा सल्ला देखील रामदास आठवले यांनी दिला आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाच्या माध्यमातून सरकार उलथवून लावेल, असा इशारा दिला होता. त्यावर अनेकांनी टीका देखील केली होती. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी देखील सरकार उलथवून टाकायला मनोज जरांगे यांच्याकडे किती आमदारांचा पाठिंबा आहे? असा सवाल केला होता. यावर आता किती आमदारांचा जरांगे यांना पाठिंबा आहे, हे समोर आले आहे.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २९ ऑगस्ट २०२५

## मराठा नेत्यांनी अभ्यास करून मागणी करावी, फडणवीसांचा अप्रत्यक्षपणे जरांगेंना टोला



**मुंबई :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे. ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी ही मराठा समाजासाठी हिताची नाही, असे ते म्हणालेत. तसेच मराठा आणि ओबीसी या दोन्ही समाजावर अन्याय होणार नाही, याची काळजी सरकार घेईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मराठा समाजाच्या नेत्यांनी अभ्यास करून मागणी करावी, असा टोलाही त्यांनी यावेळी अप्रत्यक्षपणे जरांगेंना हाणला.
मनोज जरांगे यांनी मुंबईला निघण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्ला चढवला होता. देवेंद्र फडणवीस मराठा समाजाला आरक्षण देत नाहीत आणि एकनाथ शिंदे यांना काही बोलू देत नाहीत, असा आरोपही जरांगे यांनी केला होता. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज माध्यमांशी संवाद साधताना आपली प्रतिक्रिया दिली.

ओबीसीमध्ये जवळपास 350 जाती आहेत. मेडिकलच्या प्रवेशाचे बघितल्यास ओबीसीचा कटऑफ एसीबीसीच्या वर आहे. एसीबीसीच्या कटऑफ ईडब्ल्यूएसच्या वर आहे. त्यामुळे आताच्या मागणीने किती भले होणार, याची मला कल्पना नाही. आकडेवारी नीट पाहिल्यास मराठा समाजाच्या हिताचे काय आहे, ते आपल्या लक्षात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.


मराठा समाजाच्या हिताचा अभ्यास करून मागणी केली पाहिजे, ही जबाबदारी मराठा समाजाच्या नेत्यांची आहे. एसीबीसी किंवा ईडब्ल्यूएसची मागणी असेल, तर राजकीय आरक्षण मिळणार नाही. राजकीय आरक्षणाचा हेतू असेल, तर वेगळी गोष्ट आहे. पण तो हेतू नसेल आणि सामाजिक, आर्थिक परिवर्तनाची लढाई असेल, तर मागणीचा योग्यप्रकारे विचार किमान काही विचारवंतांनी केला पाहिजे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मनोज जरांगेचे आंदोलन कुठेतरी राजकीय होत चाललंय हा प्रश्न आता दिसतोय. यापूर्वी काय झाले? हे सर्वांनी बघितले आहे. आजही आंदोलनासाठी रिसोर्सेस उभे करणारे कोण आहेत? हे आपल्याला पाहायला मिळतंय. आमच्यासाठी मनोज जरांगेंचे आंदोलन राजकीय नाही. आम्ही त्याला सामाजिक चष्म्यातून पाहू. काही राजकीय पक्ष त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून आपला फायदा प्रयत्न करत आहेत. पण त्यांना फायदा होण्याऐवजी नुकसानच होईल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मराठा समाजासाठीचे निर्णय मी मुख्यमंत्री आणि त्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना झाले आहेत. अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळ 15 वर्ष हा स्थापन झाले नाही? 15 वर्षे कुणाची सत्ता होती? असा सवाल करत, मी ते उभे केल्याचे फडणवीसांनी सांगितले. आज दीड लाख उद्योजक अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाने तयार केलेत. आज सारथीच्या माध्यमातून आयएएस, आयपीएस अधिकारी तयार होत आहेत. एमपीएससीचे विद्यार्थी तयार होत आहेत. स्पर्धापरिक्षांमध्ये विद्यार्थी टिकत आहे.

मराठा समाजासाठी शिक्षणाच्या योजना, वसतीगृहाच्या योजना, वसतीगृह होईपर्यंत भत्त्याच्या योजना सगळे आम्ही केलेले आहे. त्यामुळे काही लोक तोंड वर विचारतात, त्यांनी एकदा आरसा बघावा आणि त्यांनी मराठा समाजासाठी नेमके काय केले? ते सांगावे. अडीच वर्ष जे सरकार होते, त्या सरकारने मराठा समाजाच्या हिताचा घेतलेला एक निर्णय दाखवा, असे आव्हान देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीला दिले आहे.

# गँगस्टर अरुण गवळीला सुप्रीम कोर्टात जामीन





**मुंबई :** शिवसेनेचे दिवंगत नगरसेवक कमलाकर जामसंडेकर यांच्या हत्या प्रकरणात सुप्रीम कोर्टाने कुख्यात अरुण गवळीला जामीन मंजूर केला आहे. यामुळे गवळीचा तुरुंगाबाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाल्याचा दावा केला जात आहे.

कमलाकर जामसंडेकर यांची 18 वर्षांपूर्वी 2 मार्च 2007 रोजी हत्या करण्यात आली होती. जामसंडेकर त्यावेळी शिवसेनेचे नगरसेवक होते. ते आपल्या घाटकोपर येथील घरात टीव्ही पाहत असताना अरुण गवळी गँगचे गुंड त्यांच्या घरात शिरले आणि त्यांनी त्यांची गोळ्या घालून हत्या केली. तेव्हापासून अरुण गवळी तुरुंगात बंदिस्त आहे. या प्रकरणी जामीन मिळवण्यासाठी त्याने अनेकदा सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली. पण कोर्टाने ती फेटाळली. अखेर आज न्यायमूर्ती एम एम सुंदरेश व न्यायमूर्ती कोटेश्वर सिंग यांच्या खंडपीठाने त्याच्या वाढत्या वयाचा विचार करत त्याला जामीन मंजूर केला. गवळी सध्या 76 वर्षांचा आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे कमलाकर जामसंडेकर हत्या प्रकरणामुळे मुंबईत तेव्हा मोठी खळबळ माजली होती. तेव्हा या घटनेची मोठी चर्चा झाली होती. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास केला होता. त्यानंतर अरुण गवळीला अटक केली होती. त्यानंतर मुंबई सत्र न्यायालयाने गवळीसह इतर 11 आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. तर सुरेश पांचाळ, दिनेश नारकर व गणेश साळवी या सहआरोपींची सबळ पुराव्यांअभावी निर्दोष सुटका केली. विशेष म्हणजे ही घटना घडली त्यावेळी अरुण गवळी आमदार होता. त्यामुळे एका आमदाराला जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्याची ती पहिलीच वेळ होती.

2 मार्च 2007 रोजी सायंकाळी कमलाकर जामसंडेकर आपले नियमित काम संपवून घरी परतले होते. ते घाटकोपरच्या असल्फा व्हीलेज येथील रुमानी मंझील चाळीत राहत होते. ते आपल्या घरात निवांत टीव्ही पाहत असताना अरुण गवळीचे गुंड त्यांच्या घरात शिरले. त्यांनी जामसंडेकर दिसताच त्यांच्यावर धाडधाड गोळ्या झाडल्या. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. पोलिसांच्या माहितीनुसार, सदाशिव सुर्वे व साहेबराव भिंताडे यांनी जामसंडेकर यांच्या हत्येची गवळीला 30 लाख रुपयांची सुपारी दिली होती. या प्रकरणात सुर्वे व भिंताडे यांनाही अटक झाली होती. त्यानंतर 21 मे 2008 रोजी अरुण गवळीच्याही भायखळा येथील दगडी चाळीतून मुसक्या आवळण्यात आल्या होत्या. 27 जुलै 2008 रोजी मुंबई पोलिसांनी या प्रकरणातील आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई केली होती.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेच्या कमलाकर जामसंडेकर यांनी अरुण गवळीच्या अखिल भारतीय सेना पक्षाचे उमेदवार अजित राणे याचा अवघ्या 367 मतांनी पराभव केला होता. त्यानंतर नगरसेवक म्हणून काम करत असतानाच त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली.

Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103